दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

अन्न व औषध प्रशासनाने केले 12 परवाने निलंबित व 6 व्यवसाय बंद

मुंबई : अन्न व औषध प्रशासनाने (FDA) महाराष्ट्रात अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर बडगा उगारला है. प्रशासनाने राज्यभरात मोठी धडक कारवाई करत तब्बल १.२७ कोटी रुपयांचा अयोग्य व असुरक्षित अन्नसाठा जप्त केला आहे. या मोहिमेत एकूण १२ नामांकित आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून ६ विक्रेत्यांचे व्यवसाय बंद करण्यात आले आहेत. याशिवाय, राज्यात १.६८ लाखांचा प्रतिबंधित तंबाखू व गुटखा साठा जप्त करून ५ जणांना अटक करण्यात आली आहे.

भारतासह 10 देशांचा AI पुरवठा साखळी सुरक्षित करण्याचा निर्णय!

नवी दिल्ली : आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही केवळ मनोरंजनाची किंवा साधी संगणकीय सुविधा राहिलेली नाही, तर ती कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा आणि राष्ट्रीय सुरक्षेचा कणा बनली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शर्यतीत पुढे जाण्यासाठी केवळ मोठे सॉफ्टवेअर मॉडेल्स तयार करणे पुरेसे नाही, तर त्यासाठी लागणाऱ्या सेमीकंडक्टर चिप्स, दुर्मिळ खनिजे, डेटा सेंटर्स आणि अखंड ऊर्जेची पुरवठा साखळी अबाधित राखणे गरजेचे बनले आहे. याच पार्श्वभूमीवर भारताने अमेरिका आणि इतर ८ प्रमुख मित्र राष्ट्रांसोबत मिळून एक अत्यंत दूरगामी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : २०५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

शिक्षकाचा हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने शिक्षकाचा मृत्यू

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी**परभणी तालुक्यातील धर्मपुरी येथील एका शाळेवर सुरू असलेल्या प्रशिक्षणासाठी गेलेल्या तरुण शिक्षकाचे अचानक प्रकृती खालावल्याने त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने सदर शिक्षकाचा मृत्यू झाला ही घटना 17 नोव्हेंबर मंगळवार रोजी दुपारी तीनच्या सुमारास घडली सदर प्रकरणी ग्रामीण पोलिसात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे याबाबत अधिक माहिती अशी की अमोल मनोहरराव घाडगे वय वर्ष 44 वर्षे राहणार शांतीनगर दर्गा रोड परभणी असे मयत शिक्षकांचे नाव असून सदर शिक्षक शारदा विद्यालय येथे कार्यरत होते शिक्षकाचे प्रशिक्षण असल्याने ते धर्मापुर येथील शाळेवर गेले होते त्यावेळी त्यांची प्रकृती अचानक खालावली त्यांना उपचारासाठी परभणीतील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले व तेथून पुढे शासकीय रुग्णालयात नेण्यात आले या ठिकाणी डॉक्टरने तपासून हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याचे सांगितले या प्रकरणी मयताचे भाऊ शशिकांत घाडगे यांच्या फिर्यादी वरून परभणी ग्रामीणपोलिस ठाण्यात अकस्मात मूर्तीची नोंद करण्यात आली आहे पुढीलतपास पोलीस हवालदार नबी हे करत आहेत.

समृद्ध गावांच्या शिलेदारांचा आज गौरव; लाडगाव-हिवराला 50 लाखांचे बक्षीस

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - गावाच्या विकासासाठी लोकसहभागातून केलेले प्रयत्न, प्रशासकीय कार्यक्षमता आणि विकासकामांमधील सातत्यपूर्ण कामगिरीची दखल आता पुरस्कारांच्या माध्यमातून घेतली जाणार आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०२५-२६ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा गुरुवारी (दि. १९) विभागस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात गौरव करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लाडगाव/हिवरा ग्रामपंचायतीने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावत ५० लाख रुपयांच्या पुरस्कारावर नाव कोरले आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या वतीने केंब्रिज स्कूल चौक मैदान, जालना रोड, सावंगी बायपास येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत हा सोहळा पार पडणार आहे. पुरस्कार वितरणासोबतच २०२६-२७ च्या अभियानाबाबत कार्यशाळा आणि 'दुष्काळावर मात व समृद्ध गावाचा संकल्प' या विषयावर परिसंवादही आयोजित करण्यात आला आहे.

उत्तर प्रदेश निवडणुकीसाठी भाजपची रणनीती तयार

नवी दिल्ली : पुढील वर्षाच्या सुरुवातीला होणाऱ्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकांसाठी राजकीय पक्ष तयारी करत असून रणनीती आखत आहेत. दरम्यान, भाजप डिसेंबरपासून आपला निवडणूक प्रचार तीव्र करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन हेदेखील निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. पुढील महिन्यापासून उत्तर प्रदेशचा व्यापक दौरा करणाऱ्या प्रमुख नेत्यांचे कार्यक्रम निश्चित केले जात आहेत. कार्यकर्त्यांशी संपर्क साधण्यासाठी बूथ अधिवेशने आणि शक्ती केंद्र अधिवेशने आयोजित केली जातील. गृहमंत्री अमित शाह या अधिवेशनांना संबोधित करतील. याव्यतिरिक्त उत्तर प्रदेशातील सर्व सहा विभागांमध्ये जन आशीर्वाद यात्रा आयोजित केल्या जातील. पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या या यात्रांची जबाबदारी राज्यातील वरिष्ठ नेत्यांकडे सोपवली जाईल. सर्व दौऱ्यांची सांगता लखनौ येथील एका भव्य सभेने होईल, जिथे पंतप्रधान नरेंद्र मोदी संबोधित करतील अशी अपेक्षा आहे. याशिवाय, सर्व राज्य मंत्र्यांना जिल्हे नेमून देण्यात आले असून ते प्रत्येक जिल्ह्यातील भाजपच्या वरिष्ठ कार्यकर्त्यांना भेटतील.

भारतीय नौदलाच्या 'अल्बाट्रॉस' पथकाने पूर्ण केली सुवर्णमहोत्सवी 50 वर्षे; हिंदी महासागरावर अविरत पहारा

नवी दिल्ली : भारतीय नौदलाने आपल्या सामर्थ्यशाली इतिहासात आणखी एक सुवर्णपान जोडले आहे. भारतीय नौदलाच्या दीर्घ पल्ल्याच्या सागरी टेहळणी मोहिमांनी आज आपल्या सेवेची 50 वर्षे पूर्ण केली आहेत. हा ऐतिहासिक टप्पा नौदलाच्या हवाई पथक क्रमांक 312 म्हणजेच 'अल्बाट्रॉस' पथकाच्या स्थापनेच्या 50 व्या वर्धापन दिनाशी जुळून आला आहे. गेल्या पाच दशकांपासून हिंदी महासागर आणि त्याच्या पलीकडील सागरी क्षेत्रावर हवाई मार्गाने सातत्याने नजर ठेवून भारताच्या सागरी सीमांचे रक्षण करणाऱ्या या पथकाचा गौरव करण्यात येत आहे.

इ.स. 1971च्या युद्धानंतर किनारपट्टीवर आधारित सागरी गस्ती विमानांची तीव्र गरज भासू लागली. यातूनच 18 नोव्हेंबर 1976 रोजी गोव्यातील 'आयएनएस हंसा' येथे आयएनएएस 312 हे पथक अधिकृतपणे कार्यान्वित करण्यात आले. सुरुवातीला भारतीय हवाई दलाकडून हस्तांतरित करण्यात आलेली 5 लॉकहीड सुपर कॉन्स्टलेशन विमाने या पथकात सामील करण्यात आली होती.

काळानुरूप नौदलाच्या ताफ्यात अत्याधुनिक विमानांचा समावेश होत गेला. इ.स. 1977 मध्ये इल्युशिन आयएल-38 विमाने दाखल झाल्यामुळे पाणबुडीविरोधी युद्धक्षमता अधिक मजबूत झाली. त्यानंतर इ.स. 1988 मध्ये आयएनएएस 312 मध्ये टुपोलेव्ह टीयू-142 एम विमानांचा समावेश करण्यात आल्याने गस्तीची व्याप्ती संपूर्ण हिंदी महासागरात पसरली. पुढे जाऊन इ.स. 2013 मध्ये अक्कोनम येथील 'आयएनएस राजाली' येथे अत्याधुनिक बोईंग पी-8आय विमाने दाखल झाली. या विमानांमुळे गुप्तचर माहिती संकलन, टेहळणी आणि सागरी हल्ल्याच्या क्षमतेत अभूतपूर्व क्रांती झाली.

गेल्या 5 दशकांच्या गौरवशाली प्रवासात नौदलाच्या या टेहळणी विमानांनी अनेक कठीण मोहिमा फत्ते केल्या आहेत. यात 'ऑपरेशन कॅक्टस', 'विजय', 'पराक्रम' आणि 'सिंदूर' यांसारख्या प्रमुख मोहिमांचा समावेश आहे. तसेच आंतरराष्ट्रीय चाचेगिरीविरोधी कारवाया आणि मानवी संकटाच्या वेळी शोध व बचाव कार्यामध्ये या विमानांनी मोलाचे योगदान दिले आहे.

सध्या अक्कोनम येथील आयएनएस राजाली येथे तैनात असलेले आयएनएएस 312 आणि गोव्याच्या आयएनएस हंसा येथील आयएनएएस 316 ही दोन्ही पथके आधुनिक पी-8आय विमानांच्या सहाय्याने अथांग समुद्रावर करडी नजर ठेवून आहेत. या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त वैमानिक, मोहिमांचे अधिकारी, तांत्रिक व देखभाल पथक आणि हजारो कर्मचाऱ्यांच्या निस्सीम देशसेवेचा व बलिदानाचा यथोचित सन्मान केला जात आहे. यांच्याच अफाट पराक्रम आणि व्यावसायिक कौशल्यामुळे भारताच्या सागरी सीमा आज पूर्णपणे सुरक्षित आहेत.

झारखंडमधील एनटीपीसी प्रकल्पात कन्व्हेयर बेल्टचा सांगाडा कोसळला 3 कामगारांचा जागीच मृत्यू

चतरा : झारखंडमधील चतरा जिल्ह्यातील टंडवा येथे असलेल्या राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळाच्या प्रकल्पात बुधवारी एक अत्यंत हृदयद्रावक आणि भीषण दुर्घटना घडली आहे. प्रकल्पातील बांधकाम सुरू असलेल्या कन्व्हेयर बेल्टचा लोखंडी सांगाडा अचानक तुटून खाली कोसळल्याने 3 कामगारांचा जागीच मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत अन्य 1 कामगार गंभीर जखमी झाला असून, ढिगाऱ्याखाली आणखी काही कामगार अडकले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही भयंकर दुर्घटना एनटीपीसी प्रकल्पातील 'सीएचपी जेएच-1' या ठिकाणी घडली. या ठिकाणी कन्व्हेयर बेल्ट उभारणीचे काम वेगाने सुरू होते आणि अनेक कामगार सांगाड्यावर चढून काम करत होते. मात्र, अचानक या सांगाड्याचा मुख्य भाग तुटला आणि संपूर्ण सांगाडा क्षणात खाली कोसळला. सांगाडा कोसळताच त्यावर काम करणारे कामगार खाली पडून ढिगाऱ्याखाली दबले गेले. या दुर्घटनेनंतर संपूर्ण प्रकल्प परिसरात एकच गोंधळ आणि आरडाओरड सुरू झाली.

या अपघाताची माहिती मिळताच प्रकल्प व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासनाची धावपळ उडाली.

नातेवाईकांना निरोप देण्यासाठी वंदे भारतमध्ये चढले अन् अडकले! 12 जणांना 36,000 रुपयांचा दंड



उत्तर प्रदेश : रेल्वे प्रवासात नातेवाईकांना निरोप देण्यासाठी ट्रेनमध्ये चढणे 12 जणांना चांगलेच महागात पडले. उत्तर प्रदेशातील कानपूर सेंट्रल रेल्वे स्थानकावर वंदे भारत एक्सप्रेसमध्ये चढलेल्या या प्रवाशांचे ट्रेनचे स्वयंचलित दरवाजे बंद झाल्याने त्यांना बाहेर पडता आले नाही. ट्रेन सुटल्यानंतर त्यांना इटावा स्थानकावर उतरवण्यात आले. रेल्वे नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी या सर्वांना प्रत्येकी 3,000 रुपये, म्हणजे एकूण 36,000 रुपयांचा दंड भरावा लागला.

ही घटना वाराणसी ते नवी दिल्लीदरम्यान धावणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसमध्ये घडली. कानपूरमधील वेगवेगळ्या भागांतून आलेले 12 जण आपल्या नातेवाईकांना ट्रेनमध्ये बसवण्यासाठी आणि त्यांना सामानासह व्यवस्थित जाण्यास मदत करण्यासाठी गाडीत चढले होते. मात्र, ते ट्रेनमध्ये असतानाच स्वयंचलित दरवाजे बंद झाले आणि ट्रेन स्थानकावरून रवाना झाली.

वंदे भारत ट्रेनचे दरवाजे ठराविक स्थानकांवरच उघडत असल्याने या प्रवाशांना कानपूरमध्ये उतरता आले नाही.

"भूतकाळ लक्षात ठेवला तरच भविष्य सुरक्षित राहील"

'बटेंगे तो कटेंगे' घोषणेवर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे सविस्तर स्पष्टीकरण



नवी दिल्ली : उत्तर प्रदेशमध्ये (Uttar Pradesh) आगामी विधानसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले असतानाच, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पुन्हा एकदा आपल्या 'बटेंगे तो कटेंगे' या चर्चेतील घोषणेचे ठामपणे समर्थन केले आहे. बुधवारी एका वृत्तवाहिनीच्या शिखर परिषदेत (News18 Rising Bharat Summit) बोलताना त्यांनी या घोषणेमागील नेमका उद्देश स्पष्ट केला. निवडणुका जवळ आल्या की समाजात फूट पाडण्याचा किंवा राजकीय ध्रुवीकरण करण्याचा हा प्रयत्न असल्याची टीका विरोधकांकडून होत आहे. मात्र, ही टीका फेटाळून लावत योगी आदित्यनाथ यांनी स्पष्ट केले की, हा केवळ जनतेला सतर्क आणि सावध राहण्याचा संदेश आहे.

आजच्या उत्तर प्रदेशातील शांतता आणि १० वर्षांपूर्वीची परिस्थिती यात मोठा बदल झाला आहे. मात्र, राज्याची आजची नवीन पिढी—विशेषतः 'जेन-झी' (Gen Z) आणि 'जेन-अल्फा' (Gen Alpha)—यांनी उत्तर प्रदेशातील जुना काळ पाहिलेला नाही. १० वर्षांपूर्वी राज्यात असलेली अराजकता, हिंसाचार आणि कायदा-सुव्यवस्थेची बिघडलेली स्थिती काय होती, हे आजच्या तरुणांना माहीत असणे अत्यंत गरजेचे आहे. जोपर्यंत तरुणांना राज्याचा हा कठीण भूतकाळ समजणार नाही, तोपर्यंत त्यांना आजच्या सुरक्षित वर्तमानाची किंमत आणि महत्त्व कळणार नाही, असे योगी आदित्यनाथ यांनी सांगितले.

ओळखीच्या संकटातून सुटका आणि मागील सरकारांच्या चुकांची दुरुस्ती

आपले म्हणणे अधिक स्पष्ट करताना मुख्यमंत्र्यांनी एका दशकापूर्वीच्या तरुणांच्या अनुभवांचा दाखला दिला. दहा वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशातील तरुणांना राज्याबाहेर गेल्यावर स्वतःची ओळख सांगतानाही संकोच वाटायचा, त्यांना एका मोठ्या 'ओळखीच्या संकटाचा' (Identity Crisis) सामना करावा लागत होता. पण आज तेच तरुण देशात आणि जगात विविध ठिकाणी मोठ्या अभिमानाने काम करत आहेत आणि हा सकारात्मक बदल स्वतः अनुभवत आहेत. मागील सरकारांच्या काळात ज्या चुका झाल्या होत्या, त्या आमच्या सरकारने सुधारल्या आणि म्हणूनच आज राज्याची स्थिती बदलली आहे, असा दावा त्यांनी केला.

"वर्तमान सुधारले तरच भविष्य सन्मानाचे बनेल"

भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य यांचा परस्परसंबंध समजावून सांगताना योगी आदित्यनाथ म्हणाले की, आपण आपल्या भूतकाळाकडे पाहून त्यातून धडा घेतल्याशिवाय आपले वर्तमान सुरक्षित ठेवू शकत नाही.

नातवानेच 87 वर्षांच्या निवृत्त नौदल अधिकाऱ्याला लुटले, मित्रासोबत मिळून उडवले तब्बल 29.5 लाख रुपये!

नवी दिल्ली : ज्या वयात कुटुंबाची साथ आणि प्रेमाची सर्वाधिक गरज असते, त्याच वयात घरच्याच व्यक्तीने विश्वासघात केल्याचा संतापजनक प्रकार नवी दिल्लीतून समोर आला आहे. एका 87 वर्षीय निवृत्त भारतीय नौदल अधिकाऱ्याच्या बँक खात्यावर त्यांच्याच 22 वर्षीय नातवाने डल्ला मारत तब्बल 29.5 लाख रुपयांची फसवणूक केली आहे. नातवाने आपल्या मित्राच्या मदतीने हे पैसे लांबवले आणि त्यातून मौजमजा, सहली तसेच महागड्या पार्ट्यांवर उधळपट्टी केल्याचे उघडकीस आले आहे.

हा संपूर्ण प्रकार एप्रिल ते ऑक्टोबर या सात महिन्यांच्या कालावधीत सुरू होता. वृद्ध अधिकाऱ्याच्या मुलाच्या लक्षात आले की त्यांच्या वडिलांच्या बँक खात्यातून वारंवार संशयास्पद रक्कम काढली जात आहे. त्यांनी तातडीने पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. पूर्व जिल्हा पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला असता, तक्रारदाराचा स्वतःचा 22 वर्षांचा मुलगा अभिषेक राघव आणि त्याचा मित्र तुषार चौधरी (वय 22) यांनीच हा कट रचल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी या दोघांनाही अटक केली आहे.

पूर्व जिल्ह्याचे पोलीस उपायुक्त (DCP) राजीव कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अभिषेकने अत्यंत चलाखीने स्वतःचा मोबाईल नंबर आजोबांच्या बँक खात्याशी जोडला होता. या तांत्रिक प्रवेशाचा गैरवापर करून त्याने तुषारच्या संगनमताने लाखो रुपये परस्पर ट्रान्सफर केले. तपासात असे दिसून आले की, यातील 9.2 लाख रुपये अभिषेकच्या इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक खात्यात, तर तब्बल 20.2 लाख रुपये तुषारच्या बँक खात्यात वळवण्यात आले होते.

लुटीच्या या पैशातून दोन्ही तरुणांनी अक्षरशः ऐषोआरामाचे जीवन जगायला सुरुवात केली होती. त्यांनी मनाली, नैनिताल आणि ओडिशा येथे महागड्या सहली केल्या, तसेच नोएडा येथे मित्रांसोबत मोठ्या पार्ट्यांचे आयोजन केले. इतकेच नव्हे, तर आरोपींनी 2.7 लाख रुपयांची एक जुनी कार खरेदी केली आणि त्या कारमध्ये महागडी म्युझिक सिस्टीम बसवण्यासाठी तब्बल 1.2 लाख रुपये खर्च केले.

पोलिसांनी बँकिंग रेकॉर्ड, केवायसी कागदपत्रे आणि आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेत उत्तर प्रदेशातील बुलंदशहर येथून दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या. पोलिसांनी त्यांच्याकडून दोन मोबाईल फोन आणि फसवणुकीच्या पैशातून खरेदी केलेली कार जप्त केली आहे. आरोपी अभिषेक खुर्जा येथून 'बीए एलएलबी' चे शिक्षण घेत आहे, तर त्याचा साथीदार तुषार नर्सिंगचा कोर्स करत आहे. उर्वरित रक्कम हस्तगत करण्यासाठी आणि या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, हे तपासण्यासाठी पोलिसांनी दोघांचीही पोलीस कोठडी मिळवली आहे.

रोहित पठारेला न्याय मिळावा म्हणून उपोषण; जिल्हाधिकारी कार्यालयात तरुणाचे टोकाचे पाऊल!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

वैजापूर येथील रोहित पठारे प्रकरणातील पीडिताला न्याय मिळावा, या मागणीसाठी सुरू असलेल्या उपोषणाला बुधवारी धक्कादायक वळण मिळाले. न्यायाच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या एका तरुणाने थेट जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीत आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली. या प्रकारामुळे प्रशासकीय वर्तुळासह जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात एकच खळबळ उडाली.

रोहित पठारे याला न्याय मिळावा, या मागणीसाठी संबंधित तरुण उपोषणाला बसला होता. दरम्यान, त्याने अचानक टोकाचे पाऊल उचलण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार लक्षात येताच परिसरात उपस्थित असलेल्या पोलिसांनी आणि नागरिकांनी तातडीने धाव घेत त्याला रोखले. वेळीच हस्तक्षेप झाल्याने संभाव्य अनर्थ टळला.

या घटनेने रोहित पठारे प्रकरणातील न्यायाच्या



मागणीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. न्याय मिळावा म्हणून सुरू असलेल्या आंदोलनात तरुणाने असे टोकाचे पाऊल उचलण्याचा प्रयत्न केल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर आणि आंदोलकांच्या मागण्यांकडे होत असलेल्या लक्षावर प्रश्न उपस्थित होत आहेत.







दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सं पा द की य

बर्ड फ्लूवरील पहिल्या स्वदेशी लसीचे राष्ट्रार्पण आणि आर्थिक सुरक्षा

देशातील पोल्ट्री व्यावसायिक आणि कुक्कुटपालन करणाऱ्या लाखो शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि ऐतिहासिक बातमी समोर आली आहे. बर्ड फ्लू म्हणजेच H5N1 या अत्यंत धोकादायक आणि संसर्गजन्य विषाणूपासून पक्ष्यांचे संरक्षण करण्यासाठी भारताने पहिली स्वदेशी लस विकसित केली आहे. भोपाळ येथील 'ICAR-राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग संस्थेने' (NIH-SAD) ही लस तयार केली असून, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते २० नोव्हेंबर रोजी या महत्त्वपूर्ण लसीचे अधिकृत राष्ट्रार्पण होणार आहे. २००६ मध्ये भारतात पहिल्यांदा बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव आढळल्यापासून आजवर ५०० हून अधिक प्रादुर्भावांची नोंद झाली असून, यामुळे पोल्ट्री व्यावसायिकांना नेहमीच मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. अशा पार्श्वभूमीवर ही स्वदेशी लस देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी एक मोठी संजीवनी ठरणार आहे. H5N1 विषाणूच्या क्लेड 2.3.2.1A या विशिष्ट प्रकाराविरोधात ही निष्क्रिय (Inactivated) लस विकसित करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार, बर्ड फ्लूचा मोठा उद्रेक झाल्यास देशाच्या जीडीपी वाढीवर १.५ टक्क्यांपर्यंत परिणाम होऊ शकतो आणि देशातील २० टक्क्यांहून अधिक पोल्ट्री पक्ष्यांना संसर्गाचा धोका निर्माण होऊ शकतो. २००६ मधील प्रादुर्भावामुळे भारताला तब्बल २,२०० ते ३,००० कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले होते. याशिवाय, हा धोका केवळ पक्ष्यांपुरता मर्यादित नसून सस्तन प्राणी आणि मानवांमध्येही या संसर्गाची प्रकरणे समोर आली आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) नोंदीनुसार, २००३ पासून २५ देशांत १,००३ मानवी प्रकरणे नोंदवली गेली असून, त्यात ४७९ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे पक्ष्यांचे लसीकरण करून या विषाणूचा प्रसार मुळापासून रोखणे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत अनिवार्य बनले होते. सध्या H5N1 च्या या विशिष्ट प्रकारापासून संरक्षण देणारी कोणतीही व्यावसायिक लस उपलब्ध नसल्याने स्वदेशी संशोधनाची गरज होती, जी आता यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. या लसीमुळे पोल्ट्री क्षेत्रातील आर्थिक नुकसान टळेलच, शिवाय पक्ष्यांमधून इतर प्राण्यांमध्ये आणि माणसांमध्ये होणारा संसर्ग प्रभावीपणे थांबवता येईल. २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या या राष्ट्रार्पणानंतर या लसीच्या व्यावसायिक उपलब्धतेकडे आणि तिच्या व्यापक वापराकडे संपूर्ण कृषी व पशupus संवर्धन क्षेत्राचे लक्ष लागले आहे. विज्ञानाच्या जोरावर बर्ड फ्लूच्या संकटावर मात करणारी ही स्वदेशी लस भारताच्या आत्मनिर्भरतेचे एक उत्तम उदाहरण ठरली आहे.

स्त्रीशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारे महात्मा फुले यांचे कालातीत विचार



भारतीय समाजाच्या इतिहासात स्त्रीशिक्षणाची चळवळ म्हणजे सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा अध्याय आहे. आज मुली शिक्षणाच्या प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करीत आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, उद्योग, शेती, संरक्षण, क्रीडा आणि संशोधन अशा विविध क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे. मात्र, या प्रगतीच्या पायाभरणीमागे अनेक समाजसुधारकांचे संघर्षमय योगदान आहे. या परिवर्तनाच्या इतिहासात महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांचे कार्य विशेष महत्त्वाचे आहे.

महात्मा फुले यांचे द्विजन्मशताब्दी वर्ष म्हणजे केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा प्रसंग नाही, तर त्यांनी मांडलेल्या स्त्रीशिक्षणाच्या विचारांचे पुनर्मूल्यांकन करण्याची आणि ते वर्तमान व भविष्याच्या सामाजिक वास्तवाशी जोडण्याची संधी आहे. स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवणारी सामाजिक मानसिकता बदलल्याशिवाय समाजाची सर्वांगीण प्रगती होणार नाही, हे महात्मा फुले यांनी दीडशे वर्षांपूर्वीच ओळखले होते. त्यांचे हे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आणि कालातीत आहेत.

स्त्रीशिक्षणासाठी प्रतिकूल परिस्थितीत क्रांतिकारी पाऊल

एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाजात स्त्रियांच्या शिक्षणाबाबत अनेक गैरसमज आणि रूढी प्रचलित होत्या. मुलींनी शिकू नये, त्यांचे कार्य केवळ घर सांभाळण्यापुरतेच मर्यादित असावे, अशी पुरुषप्रधान मानसिकता समाजात रुजलेली होती. स्त्रियांना शिक्षण देणे हे परंपरेविरुद्धचे पाऊल मानले जात होते. अशा काळात महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला.

महात्मा जोतीराव फुले यांनी 1 जानेवारी 1848 रोजी पुण्यातील भिडेवाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. ही घटना भारतीय स्त्रीशिक्षणाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरली. तत्कालीन समाजव्यवस्थेत मुलींसाठी शाळा सुरू करणे हे केवळ शैक्षणिक कार्य नव्हते, तर स्त्रीच्या माणूस म्हणून असलेल्या अधिकाराची केलेली ठाम मांडणी होती.

या कार्यासाठी त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले आणि शिक्षिका म्हणून कार्य करण्यास प्रोत्साहित केले. सावित्रीबाई यांनीही समाजातील विरोध, अपमान आणि छळ सहन करून मुलींना शिकविण्याचे कार्य सुरू ठेवले. त्यांच्या या कार्यात फातिमा शेख यांनीही मोलाची साथ दिली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या फुले दाम्पत्याने समाजाच्या विरोधापेक्षा स्त्रियांच्या भविष्याला अधिक महत्त्व दिले. त्यामुळेच त्यांच्या कार्यातून स्त्रीशिक्षणाची चळवळ व्यापक झाली.

स्त्रीशिक्षण म्हणजे केवळ साक्षरता नव्हे, तर स्वावलंबन

महात्मा फुले यांच्या स्त्रीशिक्षणविषयक विचारांचा गाभा स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता देण्यात आहे. त्यांच्या मते स्त्री ही केवळ कुटुंबातील जबाबदाऱ्या पार पाडणारी व्यक्ती नसून समाजाच्या निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारी स्वतंत्र नागरिक आहे. शिक्षणामुळे स्त्रीला स्वतःच्या अधिकारांची जाणीव होते. ती अन्यायाविरुद्ध आवाज उठवू शकते, स्वतःचे निर्णय घेऊ शकते आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ शकते. शिक्षण हे स्त्रीच्या आत्मसन्मानाचे आणि सामाजिक प्रतिष्ठेचे प्रभावी साधन आहे, हा विचार त्यांच्या कार्यातून प्रकर्षाने दिसून येतो.

स्त्रीशिक्षणामुळे केवळ एका व्यक्तीचे आयुष्य बदलत नाही, तर संपूर्ण कुटुंबाच्या विचारविश्वात परिवर्तन घडते. सुशिक्षित स्त्री पुढील पिढीला शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगते. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव, समानता आणि मानवी मूल्यांचे संस्कार रुजविण्यात तिची महत्त्वपूर्ण भूमिका असते.

शिक्षणातून स्त्रीला सामाजिक अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ

महात्मा फुले यांच्या काळात बालविवाह, विधवांचे हाल, स्त्रियांवरील सामाजिक बंधने, अस्पृश्यता आणि जातीय विषमता यांसारख्या अनेक समस्या समाजात होत्या. स्त्रियांना स्वतःच्या जीवनाबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते.

महात्मा फुले यांनी या अन्यायकारक व्यवस्थेला विरोध केला. विधवांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घेतली. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून संकटात सापडलेल्या विधवांना आणि त्यांच्या बालकांना आधार देण्याचे कार्य केले. स्त्रीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, ही भूमिका त्यांनी कृतीतून मांडली. त्यांच्या मते समाजातील स्त्री-पुरुष विषमता दूर करण्यासाठी शिक्षण आवश्यक होते. स्त्री शिकली तर ती स्वतःवरील अन्याय ओळखू शकेल आणि त्याविरुद्ध उभी राहू शकेल. त्यामुळे स्त्रीशिक्षण ही सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेची पूर्वअट आहे, असे त्यांच्या कार्यातून स्पष्ट होते.

शिक्षणाचा अधिकार सर्व महिलांना मिळावा

महात्मा फुले यांचे स्त्रीशिक्षणविषयक कार्य केवळ उच्चवर्गीय किंवा आर्थिकदृष्ट्या संपन्न कुटुंबांतील मुलींपुरते मर्यादित नव्हते. जात, धर्म, आर्थिक परिस्थिती आणि सामाजिक स्तर यांचा विचार न करता प्रत्येक मुलीला शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. समाजातील वंचित आणि शोषित घटकांतील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. शिक्षणाचा अधिकार हा जन्माधारित विशेषाधिकार नसून प्रत्येक मानवाचा मूलभूत अधिकार आहे, हा विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून समाजासमोर ठेवला.

आजच्या काळात मुलींचे शिक्षण, शाळांमधील गळती रोखणे, ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलींना शिष्यवृत्ती देणे आणि डिजिटल शिक्षणापर्यंत त्यांची पोहोच वाढविणे या सर्व बाबी महात्मा फुले यांच्या विचारांशी जोडलेल्या आहेत.

आजच्या काळातील स्त्रीशिक्षणाची आव्हाने

आज स्त्रीशिक्षणाचा विस्तार झाला असला तरी अनेक आव्हाने कायम आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांतील मुलींचे शिक्षण, आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडणाऱ्या विद्यार्थिनी, बालविवाह, डिजिटल साधनांची अनुपलब्धता, उच्च शिक्षणातील संधींची असमानता आणि सुरक्षित शैक्षणिक वातावरणाचा अभाव या समस्या आजही काही प्रमाणात दिसून येतात. मुलींना प्राथमिक शिक्षण मिळणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्यांना उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, कौशल्य विकास आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध करून देणेही आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात मुलींना संगणक शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योजकता आणि आर्थिक साक्षरता यांचे ज्ञान मिळणे गरजेचे आहे. शिक्षणामुळे मुलगी केवळ नोकरी मिळविणारी व्यक्ती न बनता रोजगार निर्माण करणारी, संशोधन करणारी आणि समाजाला दिशा देणारी नेतृत्वक्षम नागरिक बनली पाहिजे.

यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी यांच्यात भेद न करता दोघांनाही समान संधी देण्याची मानसिकता प्रत्येक कुटुंबात निर्माण होणे ही काळाची गरज आहे.

द्विजन्मशताब्दी वर्ष : विचारांचा जागर करण्याची संधी

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करताना स्त्रीशिक्षणाचा विचार समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे आहे. केवळ व्याख्याने, कार्यक्रम, अभिवादन आणि स्मृतिसोहळे आयोजित करण्यापेक्षा त्यांच्या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. प्रत्येक मुलगी शाळेत गेली पाहिजे, प्रत्येक विद्यार्थिनीला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे, आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही मुलीचे शिक्षण थांबता कामा नये आणि शिक्षणानंतर तिला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळाली पाहिजे, हा संकल्प या वर्षानिमित्त केला पाहिजे.

विशेषतः ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाबाबत जनजागृती करणे, पालकांचे समुपदेशन करणे, शाळाबाह्य मुलींना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आणि उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, हे महात्मा फुले यांच्या विचारांना कृतीत उतरविण्याचे प्रभावी मार्ग ठरू शकतात.

स्त्रीशिक्षणाचा विचार कधीही कालबाह्य होणार नाही!

महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्रीशिक्षणासाठी केलेला संघर्ष हा एका विशिष्ट काळापुरता मर्यादित नव्हता. तो स्त्रीच्या स्वातंत्र्याचा, समानतेचा, आत्मसन्मानाचा आणि मानवी हक्कांचा संघर्ष होता. त्यांनी शिक्षणाची दारे खुली केली; सावित्रीबाई फुले यांनी त्या दारातून हजारो मुलींना ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेले. या दोघांच्या कार्यामुळे भारतीय समाजात स्त्रीशिक्षणाच्या चळवळीला नवी दिशा मिळाली.आज भारतीय महिला विविध क्षेत्रांत नेतृत्व करीत आहेत. मात्र, प्रत्येक मुलीला समान संधी मिळेपर्यंत आणि शिक्षणाच्या माध्यमातून ती स्वावलंबी होईपर्यंत स्त्रीशिक्षणाची चळवळ पूर्ण झालेली मानता येणार नाही. महात्मा फुले यांचे स्त्रीशिक्षणविषयक विचार आपल्याला सांगतात की, समाजाची प्रगती ही केवळ पुरुषांच्या शिक्षणावर अवलंबून नसते, तर स्त्री आणि पुरुष दोघांनाही समान शैक्षणिक संधी मिळाल्यावरच समाजाचा सर्वांगीण विकास साध्य होतो.

द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त महात्मा फुले यांच्या कार्याचे स्मरण करताना प्रत्येक मुलीच्या हातात पुस्तक, प्रत्येक मुलीच्या मनात आत्मविश्वास आणि प्रत्येक मुलीच्या आयुष्यात स्वावलंबनाची संधी निर्माण करणे, हीच त्यांना वाहिलेली खरी आदरांजली ठरेल. कारण स्त्रीशिक्षणाचा विचार हा केवळ इतिहासाचा वारसा नसून समताधिष्ठित, प्रगत आणि सक्षम भारताच्या भविष्याचा भक्कम पाया आहे.

प्रभाकर बारहाते
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, परभणी

शिक्षणमहर्षी नरसू पाटील यांच्या हस्ते 'रायगड संदेश'च्या सातव्या दिवाळी अंकाचे दिमाखदार प्रकाशन!



उरण दि १८(विठ्ठल ममताबादे)सुप्रसिद्ध उद्योजक तथा शिक्षणमहर्षी नरसू पाटील यांच्या शुभहस्ते 'रायगड संदेश'च्या सातव्या दिवाळी अंकाचे प्रकाशन मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाले. या प्रकाशन सोहळ्यामुळे 'रायगड संदेश'च्या पत्रकारितेच्या प्रवासात आणखी एक महत्त्वपूर्ण आणि अभिमानास्पद टप्पा जोडला गेला आहे.

मराठी पत्रकारिता, साहित्य आणि वाचन संस्कृतीचा वारसा जपण्याच्या उद्देशाने 'रायगड संदेश'च्या माध्यमातून गेल्या सात वर्षांपासून सातत्याने विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय विषयांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे. याच परंपरेचा भाग म्हणून यंदाचा सातवा दिवाळी विशेषांक वाचकांच्या भेटीला आला आहे.

दिवाळी अंक ही केवळ साहित्याची मेजवानी नसून समाजातील विचार, अनुभव, भावना आणि परिवर्तनाचे प्रतिबिंब असते. नवोदित लेखक, कवी आणि साहित्यिकांना आपले विचार मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच नव्या पिढीमध्ये वाचन आणि लेखनाची आवड निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

शिक्षणमहर्षी नरसू पाटील यांच्या हस्ते झालेल्या या प्रकाशनामुळे 'रायगड संदेश' परिवाराचा उत्साह द्विगुणित झाला. सात वर्षांच्या या प्रवासात वाचक, जाहिरातदार, लेखक, कवी, हितचिंतक आणि सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्यामुळेच हा टप्पा गाठता आला असल्याची भावना संपादक विशाल सावंत यांनी व्यक्त केली.

सातत्य, सामाजिक बांधिलकी आणि निर्भीड पत्रकारितेचा वारसा जपत 'रायगड संदेश'ची वाटचाल अशीच पुढे सुरू राहणार आहे.

या प्रसंगी कोकण लेखनीचे संपादक आसिम शेख, आर पी आयचे युवा नेते अक्षय आहिरे आदि सह मान्यवर उपस्थित होते

14 वा राज्यस्तरीय कराटे ट्रेनिंग कॅम्प संपन्न

उरण दि १८(विठ्ठल ममताबादे)शोतोकान कराटे डू स्पोर्ट्स महाराष्ट्र, मिक्स बॉक्सिंग फेडरेशन रायगड व विजय विकास सामाजिक संस्था ऑल स्टाईल कराटे फेडरेशन यांच्या वतीने दिनांक १२ नोव्हेंबर २०२६ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीमध्ये पेण कुरमुली श्री. बल्लाळेश्वर फार्म हाऊस येथे कराटे ट्रेनिंग कॅम्प मोठया उत्साहात पार पाडण्यात आला. या कराटे कॅम्पमध्ये एकूण ६० ज्युनिअर व सिनियर विदयार्थ्यांनी सहभाग घेतला. या कॅम्पमध्ये फुल कॉन्टॅक्ट व सेमी कॉन्टॅक्ट कराटे, ज्युडो, मिक्स बॉक्सिंग, वेपन्स, कराटे काताज, किक बॉक्सिंग, नानचाकू यांचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच या कॅम्पमध्ये मुलींसाठी स्व-संरक्षणाचे ज्ञान कसे संपादन करावे यांचे प्रशिक्षण देण्यात आले. या कॅम्पमध्ये सर्व ज्युनिअर व सिनियर ब्लॅक बेल्ट उपस्थित होते.

त्यामध्ये विकास भोईर सर महाराष्ट्र प्रेसिडेंट शोतोकान कराटे डू स्पोर्ट्स असोसिएशन अध्यक्ष, मिक्स बॉक्सिंग फेडरेशन रायगड अध्यक्ष तसेच विजय विकास सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष व दिपक घरत सर, प्रगती भोईर, घरत मॅडम, महेश भोईर सर, अजय तांडेल, अर्थव घरत, सोनल तांडेल, किरण हरगिलवाड, मिलन जाधव, पृथ्वीराज कुंभार, निखिल पाटील, स्वरा पेढवी, नैतिक घरत हे ब्लॅक बेल्ट उपस्थित राहून प्रशिक्षण दिले., हरेश्वर ठाकूर यांनी सी.पी.आर बद्दल मार्गदर्शन केले. तसेच एकलव्य अकॅडमीचे राम सर आणि रूद्रांश अकॅडमीच्या गुंजन मॅडम यांनी मोलाचे मार्गदर्शन दिले. या कॅम्पसाठी माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी पुढील वाटचालींसाठी शुभेच्छा देऊन कॅम्पमध्ये सहभाग घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे मनोधैर्य वाढवले. उपस्थित सर्व मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली १४ वा राज्यस्तरीय कराटे कॅम्पची सांगता मोठया उत्साहात करण्यात आली.

पालम येथे 28 नोव्हेंबरला शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा

न्यायमूर्ती सचिन एस. देशमुख यांच्या हस्ते होणार उद्घाटन; कायदेविषयक महाशिबिराचेही आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: नागरिकांना विविध शासकीय सेवा व लोककल्याणकारी योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच सर्वसामान्यांना कायदेविषयक मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने पालम येथील गजानंद मंगल कार्यालय येथे शनिवार, दि. 28 नोव्हेंबर रोजी 'शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आणि कायदेविषयक महाशिबिर' आयोजित करण्यात आले आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी, तालुका विधी सेवा समिती, पालम तसेच जिल्हा प्रशासन परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा परभणी जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती सचिन एस. देशमुख यांच्या हस्ते या महामेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष आर. एम. सांडराणी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण, पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

महामेळाव्याच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय विभागांच्या सेवा, शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती तसेच कायदेविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. विशेषतः सर्वसामान्य नागरिकांना शासकीय योजनांची माहिती मिळण्यासह त्यांच्या लाभासाठी आवश्यक मार्गदर्शन मिळण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भूषण एम. काळे हे कार्यक्रमाचे निमंत्रक आहेत. तसेच दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर मनीषा एम. पाटील, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. एस. टी. अडकिणे आणि पालम तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. शाम रोकडे यांच्या सहभागातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महामेळाव्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय सेवा, विविध योजनांचा लाभ आणि कायदेविषयक मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन 7 ते 18 डिसेंबरदरम्यान

परभणी: महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार, ७ डिसेंबर ते शुक्रवार, १८ डिसेंबर २०२६ या कालावधीत नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे. विधानभवन येथे आयोजित विधानसभा आणि विधानपरिषदेच्या विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. या बैठकीला विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्रशिक्षण तथा संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार, दीपक केसरकर, नाना पटोले, विजय वडेट्टीवार जितेंद्र आव्हाड, सुनील प्रभू, अमीन पटेल, विधानपरिषद सदस्य अनिल परब, विक्रम काळे, सतेज पाटील, प्रवीण दरेकर आणि विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत आगामी हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीबाबत सविस्तर चर्चा करून ७ ते १८ डिसेंबर २०२६ या कालावधीत अधिवेशन आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच दोन आठवड्यांच्या विधिमंडळ कामकाजाच्या नियोजनाचा आढावा घेऊन त्याबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

पाथरी विधानसभा मतदारसंघातंर्गत परभणी तालुक्यातील गावांसाठी दुष्काळ निवारणार्थ प्रशासनाकडून आढावा

प्रत्येक गावाला मुबलक व सुरळीत पाणी पुरवण्याचे निर्देश

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: पाथरी विधानसभा मतदारसंघांतर्गत परभणी तालुक्यातील 65 गावांमधील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन नागरिकांना दिलासा देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचे नियोजन करण्याच्या अनुषंगाने आज परभणी येथील बी. रघुनाथ सभागृहात प्रशासनाकडून आढावा बैठक घेण्यात आली.

बैठकीला आमदार राजेश विटेकर, जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्रीकांत विटेकर, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, तहसीलदार संदीप राजपुरे यांच्यासह पंचायत समिती सदस्य, सरपंच, स्थानिक लोकप्रतिनिधी, संबधित विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, संभाव्य पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा व पाणी, जलतारा शोषखड्डे, सिंचन सुविधा, भूजल पातळी, कृषी व पीक परिस्थिती, पीक विमा, वीजपुरवठा तसेच विविध पाणीपुरवठा योजनांचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला. उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले यांनी संबंधित विभागांकडून सद्यस्थिती व प्रस्तावित उपाययोजनांची माहिती घेतली.

दुष्काळी परिस्थितीमुळे आगामी काळात काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता बैठकीत व्यक्त करण्यात आली. विशेषतः जानेवारी महिन्यानंतर काही गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागू शकतो, अशी माहिती देण्यात आली. यापूर्वी पाणीपुरवठ्यासाठी अधिग्रहित केलेल्या काही विहिरींची पाणीपातळी कमी झाल्याने पर्यायी व्यवस्था उभारावी लागणार आहे. अशा गावांमध्ये आवश्यकतेनुसार टँकर सुरू करण्याचे नियोजन करण्यावर चर्चा झाली. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी गावातील विहिरींचे खोलीकरण, नवीन विंधनविहीर घेणे अथवा पर्यायी पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण करणे याबाबत प्रस्ताव तयार करण्याची सूचना करण्यात आली. तसेच प्रस्तावित आराखड्यात संबंधित गावांच्या पाणीपुरवठा योजनांचा समावेश करण्याबाबत चर्चा झाली. तीन नवीन विहिरी व पाणीपुरवठ्यासंदर्भातील प्रस्तावांचाही आढावा घेण्यात आला.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा व पाण्याची उपलब्धता कायम ठेवणे आवश्यक असल्याने चारा नियोजनाचा आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागात जलसंधारणाची कामे, जलतारा शोषखड्ड्यांची निर्मिती आणि उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य व्यवस्थापन करण्याबाबत चर्चा करण्यात आली. शेतीसाठी आवश्यक सिंचन सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच भूजल पातळीतील घट लक्षात घेऊन पाणी वापराचे नियोजन करण्यावर भर देण्यात आला.

परभणी तालुक्यातील 17 महसूल मंडळांमध्ये मागील वर्षी शेतकऱ्यांना मिळालेला पीक विमा आणि चालू वर्षातील पीक विम्याची सद्यस्थिती याबाबतही बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला. खरीप हंगामातील पीक परिस्थिती, शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान आणि विमा योजनेच्या अनुषंगाने संबंधित विभागांकडून माहिती घेण्यात आली. तालुक्यातील काही गावांमध्ये वीजपुरवठा नियमित सुरू ठेवण्याची बाबही बैठकीत मांडण्यात आली. दुष्काळी परिस्थितीत शेतीसाठी तसेच पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी वीजपुरवठा सुरळीत राहणे महत्त्वाचे असल्याने याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यावर चर्चा झाली.

दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी पाणीपुरवठा, विहीर खोलीकरण, नवीन विंधनविहिरी, टँकरद्वारे पाणीपुरवठा, चारा उपलब्धता, सिंचन आणि जलसंधारण या बाबींवर गावनिहाय नियोजन करण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली. सरपंच व स्थानिक प्रतिनिधींनी सिरसी बु., धर्मापुरी, पेडगाव, वडगाव तर्फे यासह विविध गावांमधील स्थानिक अडचणी आणि आवश्यक उपाययोजनांकडे लक्ष वेधले.

शासनाच्या विविध दुष्काळ निवारण उपाययोजनांचा लाभ गरजू शेतकरी, शेतमजूर, पशुपालक आणि ग्रामीण नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचावा, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, तसेच आवश्यक प्रस्ताव व आगामी उपाययोजनांचे नियोजन करावे, याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

शालार्थ आयडी घोटाळ्यात मालेगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक तर महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांना अटक

मालेगाव : उत्तर महाराष्ट्रातील गाजलेल्या व शिक्षण क्षेत्राला हादरवून सोडवणाऱ्या शालार्थ आयडी घोटाळ्याच्या आरोपावरून मालेगाव येथील प्रसिद्ध मालेगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक जाहिद हुसेन मोहम्मद अली (रा. रौनकाबाद) तसेच येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुनील वडगे यांना जिल्हा आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेन मंगळवारी अटक केली. अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

८ महिलांसह १२ संशयित फरार

मालेगाव हायस्कूलच्या शिक्षीका जैनम मोहंमद, सिमा निहाल दुलार यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली होती. पवारवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यात तब्बल पावणेतीन कोटींचा घोटाळा उघडकीस आल्याने हा गुन्हा आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे चौकशीसाठी आला. यात संस्थेचे अध्यक्ष इस्हाक जरीवाला, मुख्याध्यापक जाहिद हुसेन, लिपीक नासीर हुसेन, अबु हुरैरा, मध्यस्थ नवीद सगीर १३ जणांचा समावेश आहे. ८ महिलांसह १२ संशयित फरार आहे. यातील पाच संशयित शिक्षकांना १३ महिन्याचे अटकेनंतर जामीन मंजूर झाला आहे.

तर येथील कर्मवीर या. ना. जाधव विद्यालयात चार कर्मचाऱ्यांची बेकायदेशीर नियुक्ती करून बोगस 'शालार्थ आयडी' तयार केल्याप्रकरणी वडगे यांना अटक करण्यात आली. न्यायालय

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

महेंद्र दळवींच्या वक्तव्यावर उरण राष्ट्रवादीचा संताप; परीक्षित ठाकूर यांचा पलटवार!

"मरण प्रत्येकालाच आहे, दुसऱ्याच्या मृत्यूची भाषा करण्यापेक्षा स्वत:च्या शब्दांचे भान ठेवा"; दळवींना जशास तसे उत्तर देण्याचा इशारा

उरण दि. १८ (विठ्ठल ममताबादे) राजकारणात विरोधकांशी संघर्ष करावा, विचारांची लढाई लढावी; मात्र मित्रपक्षातील ज्येष्ठ नेत्यांविषयी बोलताना किमान सभ्यतेचे भान तरी ठेवावे, अशी अपेक्षा असते. परंतु शिवसेना (शिंदे गट) चे आमदार महेंद्र दळवी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे रायगड जिल्ह्यात महायुतीतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या वक्तव्याचा उरण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) आणि तालुकाध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी जाहीर निषेध केला आहे. ठाकूर यांनी दळवींना थेट प्रत्युत्तर देत त्यांच्या वक्तव्यावरून लोकप्रतिनिधींच्या भाषेच्या मर्यादेचा प्रश्न उपस्थित केला आहे.

माणगाव येथील पक्षप्रवेश कार्यक्रमात आमदार महेंद्र दळवी यांनी सुनील तटकरे यांच्यावर वैयक्तिक स्वरूपाची टीका केली होती. तटकरे कुटुंबाला कधीही जवळ करणार नसल्याचे सांगतानाच सुनील तटकरे यांना त्यांच्या पक्षात कोणीही विचारत नसल्याचा दावा केला. आगामी काळात त्यांची पक्षातून हकालपट्टी होईल, असेही त्यांनी म्हटले. त्यातच 'मरतानाही कफन घेऊन जाणार' अशा आशयाच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

या वक्तव्याची दखल घेत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी रत्नागिरी येथे पत्रकार परिषदेत आमदार महेंद्र दळवी यांच्या वक्तव्याशी शिवसेना पक्षाचा संबंध नसल्याचे स्पष्ट केले. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दळवींना समज दिल्याची माहितीही त्यांनी दिली. दुसरीकडे खासदार सुनील तटकरे यांनी "पांडुरंगाने त्यांना क्षमा करावी," असे म्हणत संयमी प्रतिक्रिया दिली.

उरण राष्ट्रवादीचा जाहीर निषेध; ठाकूर यांचा दळवींना थेट सवाल!

आमदार महेंद्र दळवी यांच्या वक्तव्याचा निषेध करताना परीक्षित ठाकूर यांनी स्पष्ट केले की, सुनील तटकरे साहेब हे आमच्यासाठी गुरुस्थानी आहेत. त्यांच्याबद्दल केलेला अपमानास्पद उल्लेख राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते कदापि सहन करणार नाहीत.



विशेष म्हणजे, परीक्षित ठाकूर यांनी शिवसेना पक्षाला या वादात ओढलेले नसून आपला आक्षेप केवळ आमदार महेंद्र दळवी यांच्या वैयक्तिक वक्तव्यावर असल्याचे स्पष्ट केले. आमदारपद हे जनतेने दिलेली जबाबदारी आहे, वैयक्तिक टीका करण्याचा परवाना नाही. सार्वजनिक व्यासपीठावरून बोलताना पदाची प्रतिष्ठा आणि भाषेची मर्यादा राखणे गरजेचे आहे. राजकीय मतभेद असू शकतात; मात्र वैयक्तिक पातळीवर जाऊन अशा प्रकारची भाषा वापरणे सुसंस्कृत राजकारणाला शोभणारे नाही, असे ठाकूर यांनी सुनावले.

"दळवीसाहेब, मरण प्रत्येकालाच आहे; दुसऱ्याकडे उगाचच बोट दाखवू नका!"

सुनील तटकरे यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना परीक्षित ठाकूर यांनी अत्यंत परखड भूमिका मांडली. "आमदार महेंद्र दळवी हेसुद्धा मरताना कफन घेऊन जाणार आहेत. मरण प्रत्येकालाच अटळ आहे. त्यामुळे त्यांनी दुसऱ्याकडे उगाचच बोट दाखवू नये. दुसऱ्यांच्या आयुष्याबद्दल आणि मृत्यूबद्दल बोलण्यापेक्षा स्वतःच्या वक्तव्याचे आत्मपरीक्षण करावे," असे ठणकावून सांगत ठाकूर यांनी दळवींना प्रत्युत्तर दिले.

ते पुढे म्हणाले की, सुनील तटकरे साहेबांचा अपमान हा आमचा अपमान आहे. त्यांच्या सन्मानासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते ठामपणे उभे राहतील. भविष्यात आमदार महेंद्र दळवी यांनी अशाच प्रकारची वैयक्तिक आणि आक्षेपार्ह वक्तव्ये केली, तर त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

मित्रपक्षाचा सन्मान राखता येत नसेल तर महायुतीच्या एकजुटीची भाषा कशासाठी?

महायुतीमध्ये एकत्र सत्तेत सहभागी असताना मित्रपक्षाच्या वरिष्ठ नेत्यांवर सार्वजनिक व्यासपीठावरून वैयक्तिक टीका होणे कितपत योग्य आहे, असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित झाला आहे. युती केवळ सत्तेसाठी नसते, तर परस्पर सन्मान, विश्वास आणि समन्वयावर टिकून असते. त्यामुळे मित्रपक्षाच्या नेत्यांचा सन्मान राखणे ही प्रत्येक घटक पक्षाच्या पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे, अशी भूमिका परीक्षित ठाकूर यांनी मांडली.

अंतर्गत मतभेदांचा फायदा महाविकास आघाडीला होऊ नये, यासाठी महायुतीतील सर्व नेत्यांनी संयम राखून एकत्रितपणे काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

एकीकडे महायुतीच्या माध्यमातून सत्तेत एकत्र असलेले पक्ष आणि दुसरीकडे सार्वजनिक व्यासपीठावरून सुरू असलेली परस्परांवरील टीका, यामुळे रायगडमधील राजकीय समीकरणांची चर्चा रंगू लागली आहे. आमदार महेंद्र दळवी यांच्या वक्तव्याला उरण राष्ट्रवादीने जाहीर निषेध आणि आक्रमक प्रत्युत्तर दिल्याने हा वाद आता अधिक चर्चेत आला आहे. आता या प्रकरणावर शिवसेना आणि महायुतीतील अन्य पदाधिकारी काय भूमिका घेतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

मौजे शेकटा येथे तूर वाण 'गोदावरी'च्या आद्यरेषीय प्रात्यक्षिकाला डॉ. इन्द्र मणि यांची भेट

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मौजे शेकटा येथे कृषिभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी श्री. सिकंदर जाधव यांच्या शेतावर वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या सुधारित तूर वाण 'गोदावरी'च्या आद्यरेषीय प्रात्यक्षिकास (Frontline Demonstration) विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी भेट देऊन पीक परिस्थितीची पाहणी केली. या भेटीदरम्यान कृषी संशोधन केंद्र, बदनापूरचे प्रमुख शास्त्रज्ञ (तूर) तथा कृषि महाविद्यालय, बदनापूरचे अधिष्ठाता डॉ. दीपक पाटील, कृषि महाविद्यालय, परभणीचे अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य, मृदाशास्त्र विभागप्रमुख डॉ. हरिहर कौसडीकर, मोसंबी संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. गजेंद्र जगताप तसेच कृषी विज्ञान केंद्र, बदनापूरचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सचिन सोमवंशी, कृषि संशोधन केंद्र, बदनापूर येथील शास्त्रज्ञ तसेच स्थानिक शेतकरी उपस्थित होते.



या प्रसंगी तूर पिकावर ड्रोनच्या माध्यमातून कीटकनाशक फवारणीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या प्रात्यक्षिकामुळे उपस्थित शेतकऱ्यांना आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. श्री. सिकंदर जाधव यांनी ठिबक सिंचनाखाली सुधारित 'गोदावरी' आणि स्थानिक 'चारू' या तूर वाणांची जोड ओळ व एकेरी ओळ पद्धतीने लागवड केली आहे.

प्रात्यक्षिकातील 'गोदावरी' वाणाने स्थानिक 'चारू' वाणाच्या तुलनेत पीक वाढ, फांद्यांची संख्या आणि शेंगा धारणेच्या बाबतीत अधिक उत्कृष्ट कामगिरी दर्शविल्याचे निरीक्षण करण्यात आले. माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी पीक परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण करून सुधारित वाण, शिफारशीत कृषि पद्धती आणि सूक्ष्मजीव समूह (Microbial Consortia) यांच्या एकात्मिक वापरातून उत्पादनवाढीच्या संभाव्यतेचा आढावा घेतला. शेतकऱ्यांच्या तोंडून 'शेतीमध्ये सर्व काही आहे' असे समाधानाचे उद्गार निघावेत, अशी इच्छा व्यक्त माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी व्यक्त केली. विद्यापीठाने विकसित केलेल्या तूर वाण 'गोदावरी'च्या माध्यमातून या वर्षीच्या दुष्काळी स्थितीमध्ये देखील कृषिभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी श्री. सिकंदर जाधव हे एकरी १५ क्विंटलपेक्षा अधिक उत्पादन घेण्याच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे त्यांनी नमूद केले. या यशाचे श्रेय श्री. जाधव यांच्या मेहनतीला, जिद्दीला आणि शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाला जाते, असे प्रतिपादन माननीय कुलगुरूंनी केले. महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठित 'कृषिभूषण' पुरस्कार प्राप्त प्रगतिशील शेतकरी श्री. सिकंदर जाधव यांनी आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा स्वीकार करून त्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराचे माननीय कुलगुरूंनी विशेष कौतुक केले.

पंकज भारसाखळे यांची भाजपच्या प्रदेश क्रीडा प्रकोष्ठाच्या सहसंयोजकपदी नियुक्ती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश क्रीडा प्रकोष्ठाच्या सहसंयोजकपदी माजी राष्ट्रीय खेळाडू तथा माजी नगरसेवक पंकज भारसाखळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याकडे मराठवाडा विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी १७ नोव्हेंबर रोजी नियुक्तीपत्राद्वारे ही घोषणा केली.

भारसाखळे यांना क्रीडा क्षेत्रातील संघटनात्मक कामाचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशनचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष, हँडबॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सहसचिव, क्रीडा भारतीचे देवगिरी प्रांत अध्यक्ष, औरंगाबाद ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष तसेच हॉकी महाराष्ट्रचे माजी उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे. याशिवाय हॉकी आणि बॉक्सिंग असोसिएशन, छत्रपती संभाजीनगरचे सचिव म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा तसेच विविध क्रीडा महोत्सवांच्या आयोजनात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. नमो चषक आणि मुख्यमंत्री चषक यांसारख्या उपक्रमांच्या आयोजनातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देणे, नवोदित खेळाडूंना संधी उपलब्ध करून देणे आणि क्रीडा संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत.

रेन वॉटर हार्वेस्टिंग बंधनकारक; तीन महिन्यांत व्यवस्था न केल्यास मनपा कर्मचाऱ्यांचे वेतन रोखणार

शासकीय आणि खासगी इमारतींसह शाळा, रुग्णालये, मंगल कार्यालयांनाही सक्ती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शहरातील भूगर्भातील पाणीपातळी सुधारण्यासाठी आता रेन वॉटर हार्वेस्टिंग (पावसाचे पाणी संकलन व पुनर्भरण) करणे अनिवार्य करण्यात येणार आहे. महापालिका हद्दीतील सर्व शासकीय व खासगी इमारती, शाळा, रुग्णालये, व्यावसायिक संकुले, मंगल कार्यालये आणि निवासी बांधकामांमध्ये ही व्यवस्था उभारावी लागणार आहे. विशेष म्हणजे, महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही पुढील तीन महिन्यांत स्वतःच्या घरात रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे बंधनकारक असून, त्याची पूर्तता न केल्यास संबंधितांचे वेतन थांबविण्याचे निर्देश आयुक्त अमोल येडगे यांनी दिले आहेत.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि केंद्र सरकारच्या 'जलशक्ती अभियान – कॅच द रेन' अंतर्गत राज्य शासनाच्या 'जलसंचय जनभागीदारी' अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महापालिकेत गठित समितीची आढावा बैठक बुधवारी आयुक्त अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत शहरातील पाणीटंचाई, भूगर्भातील खालावलेली पाणीपातळी आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. शहरातील खासगी शाळा, रुग्णालये, व्यावसायिक संकुले, मंगल कार्यालये आणि निवासी इमारतींमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था आहे की नाही, याची तपासणी करण्याचे निर्देश आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिले. यापूर्वी यंत्रणा उभारलेल्या आस्थापनांनी तिची कार्यक्षमता तपासून आवश्यक दुरुस्ती करावी. नव्याने यंत्रणा उभारणाऱ्या आस्थापनांनी कामापूर्वीची आणि कामानंतरची छायाचित्रे काढून शासनाच्या संबंधित पोर्टलवर अपलोड करावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. महापालिकेच्या सर्व प्रशासकीय इमारती, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, रुग्णालये, उद्याने आणि खुल्या जागांवरही रेन वॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. खाम व सुखना नदी परिसरातील खुल्या जागांवर यंत्रणा उभारण्यासह अस्तित्वातील व्यवस्थांची तपासणी व दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सलीम अली, हर्सूल आणि सावंगी तलावांमधील गाळ काढणे, स्वच्छता करणे आणि तलावांचे संवर्धन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

महापालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांना पुढील तीन महिन्यांत स्वतःच्या राहत्या घरी रेन वॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था करावी लागणार आहे. याबाबत छायाचित्रे व आवश्यक पुरावे प्रशासनाकडे सादर करावे लागतील. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी परिपत्रक काढण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

दरम्यान, नवीन व्यावसायिक व निवासी बांधकामांना परवानगी देताना रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी १० हजार रुपये अनामत रक्कम घेण्यात येणार आहे. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर यंत्रणा उभारल्याचे पुरावे सादर केल्यावर ही रक्कम परत केली जाईल. तसेच गुंठेवारी प्रमाणपत्रासाठीही संबंधित मालमत्ताधारकांना वैयक्तिक किंवा सामूहिक स्वरूपात रेन वॉटर हार्वेस्टिंग केल्याचे पुरावे सादर करावे लागतील. त्यानंतरच प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

हर्सूल कचरा प्रक्रिया प्रकल्पातील शेडला भीषण आग; अनर्थ टळला!

शेड व यंत्रसामग्रीचे नुकसान



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिकेच्या हर्सूल कचरा प्रक्रिया प्रकल्पातील ड्रायवेस्ट साठवणुकीच्या शेडला बुधवारी पहाटे अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. पहाटे सव्वाचार ते साडेचारच्या सुमारास लागलेल्या या आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. मात्र, अग्निशमन दलाने तातडीने धाव घेत चार अग्निशमन बंब आणि पाण्याच्या टँकरच्या मदतीने सकाळी साडेआठ ते नऊ वाजेपर्यंत आगीवर नियंत्रण मिळवले. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग इतरत्र पसरण्यापूर्वीच रोखण्यात यश आले आणि मोठा अनर्थ टळला.

हर्सूल येथील कचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या आवारात सुमारे १५ हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या शेडमध्ये सिमेंट कारखान्यात पाठवण्यासाठी प्रक्रिया केलेला ड्रायवेस्ट साठवण्यात आला होता. बुधवारी पहाटे या शेडला अचानक आग लागली. घटनेची माहिती मिळताच घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत युद्धपातळीवर आग विझवण्याचे काम सुरू केले. सकाळी आगीवर नियंत्रण मिळवल्यानंतर दिवसभर धूर शमवून परिसर सुरक्षित करण्यात आला.

या दुर्घटनेत शेडच्या पत्र्यांचे काही प्रमाणात नुकसान झाले असून, प्री-सॉर्टिंग आणि बेलिंग मशिनचेही किरकोळ नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच महापालिका आयुक्त अमोल येडगे आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. महापौर, उपमहापौर आणि सभापती यांनीही दूरध्वनीवरून परिस्थितीचा आढावा घेत प्रशासनाला सूचना दिल्या.

आयुक्त येडगे यांनी भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी अग्निशमन उपाययोजना अधिक सक्षम करण्याचे निर्देश दिले. तसेच आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज तपासून सविस्तर चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश उपायुक्त भोंबे यांना दिले. प्रकल्पाचे काम करणाऱ्या 'मायो एस.एस.' या एजन्सीची जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

दरम्यान, हर्सूल डेपोतील ओल्या कचऱ्याचे प्रक्रिया युनिट नियमित सुरू असून, ड्रायवेस्टच्या प्री-सॉर्टिंग परिसरातील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले.

उरण तालुक्याचे सुपुत्र सुधीर मुंबईकर राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित



उरण दि १८(विठ्ठल ममताबादे)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे ६५ वे राज्यस्तरीय अधिवेशन पालघर जिल्ह्यातील बोर्डी येथे दोन दिवस उत्साहात पार पडले. राज्यातील विविध जिल्ह्यांतील मुख्याध्यापक, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षण संस्थांचे पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत शैक्षणिक व प्रशासकीय प्रश्नांवर व्यापक विचारमंथन करण्यात आले. अधिवेशनाचे अध्यक्षस्थान कोल्हापूरचे डॉ. बी. बी. पाटील यांनी भूषविले.या अधिवेशन मध्ये उरण तालुक्याचे सुपुत्र तथा जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्ट शाळा मोराचे मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर यांना शिक्षण क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार २०२६ ने गौरविण्यात आले.

या पुरस्कार सोहळा प्रसंगी पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार निरंजन डावखरे, आमदार हरिश्चंद्र भोये, शिक्षक आमदार कौस्तुभ गावडे, स्वागताध्यक्ष तथा तारापूर इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष व प्रगती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. के. राजपूत, पालघर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक पाटील, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष दीपक पवार, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य संभाजी भोजने, चंदूलाल घरत आणि संजय पाटील उपस्थित होते. या अधिवेशनात रायगडचे व्हि. व्हि. पाटील, के. डी. म्हात्रे, किशोर भोईर, उत्तेकर सर, मगर सर, मार्गे सर, वळवी मॅडम, राज्य महामंडळाचे पदाधिकारी यांचीही विशेष उपस्थिती यावेळी होती. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मुख्याध्यापकांना राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.यावेळी उरण तालुक्याचे सुपुत्र आदर्श मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर यांना राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.पुरस्कार मिळाल्या बद्दल जे एम म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्ट संस्थेचे संस्थापक जे एम म्हात्रे, युवा नेते प्रितम म्हात्रे, चेअरमन परशुराम कोळी, चंद्रकांत कोळी यांनी व संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी तसेच शिक्षण विभाग पंचायत समिती, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन करून कौतुक केले.विद्यार्थीनिष्ठ, शिक्षण प्रेमी, कर्तव्यनिष्ठ असलेले आदर्श मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर यांना राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

रामप्रसाद देवकर यांची वीर वडार एकता फाउंडेशनच्या हिंगोली जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

हिंगोली | वीर वडार एकता फाउंडेशनच्या वतीने मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात हिंगोली जिल्ह्यातील वडार समाजाचे संघटन मजबूत करण्यासाठी तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी मा. श्री. रामप्रसाद मसाराव देवकर यांची हिंगोली जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. ते महिला आधार केंद्र, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत.

या नियुक्तीमुळे हिंगोली जिल्ह्यातील वडार समाज बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून स्वागत व अभिनंदन करण्यात येत आहे.

वडार समाजाला संघटनात्मकदृष्ट्या सक्षम करणे,



समाजातील युवकांना योग्य दिशा देणे, शिक्षण, रोजगार, सामाजिक एकता आणि समाजाच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, अशी महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

रामप्रसाद देवकर यांच्या नेतृत्वाखाली हिंगोली जिल्ह्यात वडार समाजाचे संघटन अधिक मजबूत होईल आणि समाजाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातील, असा विश्वास समाजबांधवांनी व्यक्त केला आहे.

या नियुक्तीबद्दल समस्त वडार समाज बांधव, हिंगोली जिल्ह्याच्या वतीने रामप्रसाद देवकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. त्यावेळी उपस्थित

वीर व वडार ऐकता फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष विजयदादा गोरे यांच्या हस्ते देण्यात आले त्यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष गणपत पिटेवाड , महाराष्ट्र समन्वयक ब्रम्हा साहेब ,महाराष्ट्र सचिव रमेश धोत्रे, हिंगोली जिल्ह्या तील माजी नगरसेवक बाबुरावजी जाधव , लक्ष्मण पापणकर ,तुळशिराम जाधव ,करण देवकर,सुनिल देवकर समाज सेवक शिवाजी शेळके,शुभम मस्के, सर्व हिंगोली जिल्ह्यातील प्रतीष्ठित मंडळी उपस्थित होती तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील पदाधिकारी उपस्थित होते

ह.भ.प. बाळकृष्ण महाराज दारकोंडे यांच्या नेतृत्वाखाली गोपाळकृष्ण महाराजांची पायी दिंडी सोहळा 35 व्या वर्षी ज्ञानोबा-तुकारामाच्या जयघोषात श्री क्षेत्र आळंदी कडे प्रस्थान

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता



खुलताबाद प्रतिनिधी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या श्रीक्षेत्र आळंदी येथील संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव येथील श्री सद्गुरू गोपाळ कृष्ण महाराज भागवत धर्म प्रसारक मंडळ संचलित पायी दिंडीचे बुधवारी (दि. १८) सलग ३५व्या वर्षी मोठ्या भक्तिभावात श्रीक्षेत्र आळंदीकडे प्रस्थान झाले. ह.भ.प. बाळकृष्ण महाराज दारकोंडे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या दिंडीत मोठ्या संख्येने वारकरी सहभागी झाले आहेत. 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने, विठ्ठलनामाच्या गजराने आणि टाळ-मृदंगाच्या निनादाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

दिंडीच्या प्रस्थानापूर्वी गल्लेबोरगाव येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठल-रुक्मिणी व श्री हनुमानाची विधिवत पूजा, आरती आणि हरिनाम कीर्तन करण्यात आले. त्यानंतर वारकऱ्यांच्या सुरक्षित व मंगलमय प्रवासासाठी प्रार्थना करून भगव्या पताका हाती घेत दिंडीने आळंदीच्या दिशेने मार्गक्रमण सुरू केले. 'चला आळंदीला जाऊ, ज्ञानेश्वर डोळा पाहू!' या भक्तिमय भावनेने वारकऱ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

गेल्या ३५ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेली ही पायी दिंडी गल्लेबोरगाव परिसरातील धार्मिक व वारकरी परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक बनली आहे. दिंडीच्या प्रवासादरम्यान दररोज पहाटे काकडा भजन, वाटचालीतील भजन, प्रवचन, हरिपाठ तसेच रात्री हरिकीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या माध्यमातून वारकऱ्यांना संतविचार, भक्ती आणि भागवत धर्माचा संदेश दिला जाणार आहे.

ही दिंडी गल्लेबोरगाव, देवगाव रंगारी, लासूर, वैजापूर, बापतारा, पुणतांबा, वाकडी, प्रवरानगर, पानोडी, साकूर, हिवरगाव पठार, घारगाव, आळे संतवाडी, नारायणगाव, अवसरी, राजगुरुनगर, आंबेठाण, श्रीक्षेत्र देहू, जाधववाडी व चिखली मार्गे श्रीक्षेत्र आळंदी येथे पोहोचणार आहे.

'ज्ञानेश्वर माऊलींच्या भेटीसाठी निघालेली ही पायी वारी केवळ यात्रा नसून भक्ती, समर्पण, शिस्त आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारी परंपरा आहे,' असे प्रतिपादन दिंडीचे नेतृत्व करणारे ह.भ.प. बाळकृष्ण महाराज दारकोंडे यांनी केले.

दिंडीला निरोप देण्यासाठी हभप शेषराव महाराज खंडागळे, हभप काकासाहेब महाराज मालोदे, ह.भ.प. नंदू महाराज भगत, ह.भ.प. रामदास महाराज तळेकर, साहेबराव दांडगे, आण्णा चंद्रटीके, बबन चंद्रटीके, बाबासाहेब दांडगे,अशोक चंद्रटीके, संताराम अमृते, संजय खोसरे, दत्तू भागवत, रामदास लवंगे, शकुंतला बडे, कौशल्याबाई भागवत, ताराबाई लेकुरवाळे यांच्यासह ग्रामस्थ, महिला, भाविक व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हरिनामाच्या गजरात आणि टाळ-मृदंगाच्या निनादात दिंडीला उत्साहपूर्ण निरोप देण्यात आला.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

छत्रपती संभाजीनगर
गुरूवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६

दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईवर मात करण्यासाठी रोजगार हमी योजनेतून चारा पिकांची लागवड करा- जिल्हाधिकारी

सात प्रकारच्या सुधारीत चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी, --परभणी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी हिरवा व कोरडा चारा उपलब्ध करून देण्याकरीता "व्हिबीजीरामजी" अंतर्गत, चारा पिकांच्या लागवडीची कामे हाती घ्यावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी आण्णासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

नैऋत्य मोसमी पावसातील तूट, एल निनोचा प्रभाव आणि रब्बी हंगामातील पेरणी क्षेत्रात संभाव्य घट यामुळे आगामी काळात चारा उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन गायरान जमिनी तसेच वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतजमिनीवर सुधारित चारा पिकांची लागवड करण्याची कामे मंजूर करण्यात येणार आहेत.

व्हिबीजीरामजी योजनेअंतर्गत, चारा पिके व वैरणयुक्त पिकांव्यतिरिक्त मका, ज्वारी, बाजरी, नेपियर गवत, मेथी घास, ज्वारी मल्टीकट आणि बाजरी मल्टीकट अशा सात प्रकारच्या चारा पिकांचा अंतर्भाव करुन लागवडीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या पिकांसाठी हेक्टरी आर्थिक तरतूद व रोजगार निर्मितीचे निकष खालील प्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत.

मका पिकासाठी 47 हजार 307 रुपये व 95 मनुष्यदिवस, ज्वारीसाठी 42 हजार 778 रुपये व 88 मनुष्यदिवस, बाजरीसाठी 35 हजार 505 रुपये व 74 मनुष्यदिवस, नेपियर गवतासाठी 76 हजार 31 रुपये व 155 मनुष्यदिवस,

मेथी घासासाठी 1 लाख 13 हजार 290 रुपये व 270 मनुष्यदिवस, ज्वारी मल्टीकटसाठी 51 हजार 36 रुपये व 100 मनुष्यदिवस, बाजरी मल्टीकटसाठी 76 हजार 44 रुपये व 180 मनुष्यदिवस रोजगार.

या लागवडीसाठी आफ्रिकन टॉल, एनएमएच-4053, न्यूट्री गोल्ड, सीएसव्ही-33 एमएफ, न्यूट्रीफास्ट, यशवंत, जयवंत, सुपर नेपियर, आरएल-88, सीओ-1, जायंट बाजरी आदी सुधारित वाणांचा वापर करता येणार आहे. आवश्यक बियाणे महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, कृभको, भारतीय कृषी संशोधन परिषद आणि कृषी विज्ञान केंद्र यांसारख्या अधिकृत संस्थांमार्फत उपलब्ध करून घेता येईल. या योजनेत मजुरांच्या श्रमांना प्राधान्य देण्यात आले असून, मजुरांमार्फत करणे शक्य असलेल्या कामांसाठी यंत्रसामग्रीचा वापर करण्यास मनाई आहे. त्यामुळे चारा उत्पादनासोबतच ग्रामीण भागात स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीलाही चालना मिळणार आहे. या कामांची अंमलबजावणी पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील वैयक्तिक शेतकऱ्यांनी तसेच ग्रामपंचायतींनी आपल्या कार्यक्षेत्रातील गायरान जमिनीवर आणि पात्र लाभार्थ्यांच्या शेतजमिनीवर चारा पिकांची लागवड करण्यासाठी पुढाकार घ्यावा. संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासोबतच पशुधनाचे संवर्धन आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मिती साध्य करण्यासाठी या योजनेचा प्रभावी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी केले आहे.

जनगणना 2027 च्या दुसऱ्या टप्प्यासाठी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा

जनगणनेचे काम जबाबदारीने अचूकपणे व वेळेत पूर्ण करा - जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : जनगणना २०२७ ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय मोहीम असून, तिचे काम अचूक, पारदर्शक आणि कालमर्यादित पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करावे. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे शंभर टक्के प्रशिक्षण आणि जनगणनेबाबत व्यापक जनजागृती करून जनगणनेची प्रक्रिया यशस्वी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी दिले.

जनगणना संचालनालय, महाराष्ट्र आणि जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्यातील लोकसंख्या गणनेसाठी जिल्हा, उपविभागीय, शहर तसेच चार्ज व अतिरिक्त चार्ज स्तरावरील जनगणना अधिकारी, जनगणना लिपिक आणि तांत्रिक सहायक यांच्यासाठी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन भवनाच्या सभागृहात करण्यात आले आहे. आज प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, शैलेश लाहोटी, जीवराज डापकर तसेच जनगणना संचालनालयाचे उपनिदेशक सागर बागूल आणि सांख्यिकी अन्वेषक पवन गोडे हे प्रशिक्षक म्हणून उपस्थित आहेत. जिल्हा, उपविभागीय, शहर, चार्ज व अतिरिक्त चार्ज स्तरावरील जनगणना अधिकारी, जनगणना लिपिक, तांत्रिक सहायक तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी या प्रशिक्षणात सहभागी झाले.

जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यात गृहगणनेचे काम करण्यात आले आहे. आता दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या गणना करण्यात येणार आहे. या कामासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रशिक्षणातील १०० टक्के उपस्थिती महत्त्वाची आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा अचूक वापर करून जनगणनेचे काम पारदर्शक व अचूक पद्धतीने पूर्ण करावे. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, सामाजिक संघटना आदींच्या माध्यमातून जनगणनेबाबत अधिकाधिक जनजागृती करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यातील काम निर्धारित मुदतीपूर्वी आणि कायदेशीर तरतुदींचे पालन करून पूर्ण करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी प्रास्ताविकातून दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेची माहिती दिली. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात परभणी जिल्ह्याने राज्यात नववा तर विभागात दुसरा क्रमांक मिळविला असून, ही जिल्ह्यासाठी अभिमानास्पद कामगिरी असल्याचे त्यांनी सांगितले. जनगणना ही केवळ लोकसंख्येची आकडेवारी संकलित करण्यापुरती मर्यादित नसून, देशाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक नियोजनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक व्यक्तीनिहाय ४० प्रश्नांच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात येणार असून, त्याद्वारे नागरिकांची सामाजिक व आर्थिक स्थिती जाणून घेण्यात येणार आहे. नागरिकांना स्वतःहून माहिती भरण्याचा पर्यायही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यानंतर प्रगणक प्रत्येक घरी भेट देऊन संकलित माहितीची पडताळणी करणार आहेत.

दरम्यान, जनगणना प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या संभाव्य अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांची माहितीही प्रशिक्षणातून देण्यात येत आहे. प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी डॉ. राजकुमार राठोड, नायब तहसीलदार तथा मास्टर ट्रेनर, तहसील कार्यालय, परभणी, जनगणना कक्षाचे सहायक महसूल अधिकारी अलताफ मिया, तांत्रिक सहायक प्रियंका राठोड आणि सौरभ कदम यांनी सहकार्य केले.

जनगणनेचा दुसरा टप्पा हा व्यापक स्वरूपाचा असल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रगणक, पर्यवेक्षक आणि जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी आणि त्यांची जनगणना संबंधित यंत्रणा, तसेच परभणी महानगरपालिका येथील जनगणनेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी सदर प्रशिक्षणास उपस्थित होते.

अंमली पदार्थ विरोधी कारवाई – मौजे सुपा येथे 26 किलो गांजा जप्त; 13 लाखांचा मुद्देमाल हस्तगत

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**परभणी जिल्ह्यात अंमली पदार्थांची अवैध विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने परभणी पोलीस दलाकडून सातत्याने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

दिनांक १७/११/२०२६ रोजी पोलीस पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मौजे सुपा, तांडा येथील वामन भाऊराव राठोड यांच्या शेतात छापा टाकण्यात आला. सदर कारवाईदरम्यान गांजा या अंमली पदार्थाची हिरवी पाने असलेली, मुळांसह उपटलेली व वाळविण्यासाठी ठेवलेली एकूण २६ किलो वजनाची २६ लहान-मोठी झाडे जप्त करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे किंमत **रु. १३,००,०००/- (तेरा लाख रुपये)** इतकी आहे.



सदर कारवाई पोलीस अंमलदार शिवदास धुळगुंडे व पोलीस अंमलदार अविनाश बोरगीर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे करण्यात आली. याप्रकरणी पोलीस अंमलदार शिवदास धुळगुंडे यांच्या फिर्यादीवरून आरोपी वामन भाऊराव राठोड याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन पिंपळदरी येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २२४/२०२६, कलम ८(ब), २०(अ) एनडीपीएस ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आंदोरीकर करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत, अपर पोलीस अधीक्षक श्री. तानाजी चिखले व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. स्वप्नील राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच एपीआय श्रीमती दिपाली गीते यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

या कारवाईमध्ये पोलीस उपनिरीक्षक आंदोरीकर, पोलीस अंमलदार *शिवदास धुळगुंडे, गोविंद मुरकुटे*, पोलीस शिपाई अविनाश बोरगीर, सचिन भदाडे, बनाटे व मकलेलू यांनी सक्रिय सहभाग घेतला.

परभणी जिल्ह्यात अंमली पदार्थांची लागवड, साठवणूक, विक्री व वितरण करणाऱ्यांविरुद्ध परभणी पोलीस दलाकडून कठोर कारवाई सुरूच राहणार असून, अशा अवैध प्रकारांची माहिती नागरिकांनी निर्भयपणे पोलिसांना द्यावी, असे आवाहन परभणी पोलीस दलाच्या वतीने करण्यात येत आहे.

मार्चअखेरपर्यंत जिल्ह्यात पुरेल चारा; नियोजन करा!

जितेंद्र जैस्वाल यांच्या सूचना; 14 हजार 602 पशुपालकांना बियाण्यांचे वाटप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : टंचाईच्या काळात पशुधनासाठी चाऱ्याची कमतरता भासू नये, यासाठी वैरण विकास योजनेंतर्गत रब्बी हंगामात जिल्ह्यातील १४ हजार ६०२ लाभार्थ्यांना ४८ हजार ३९६ किलो बियाण्यांचे वाटप करण्यात आले आहे. या बियाण्यांपासून उत्पादित होणारा चारा आणि उपलब्ध शिल्लक चाऱ्याचे योग्य नियोजन करून मार्चअखेरपर्यंत जिल्ह्यात चारा पुरेल, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे सभापती जितेंद्र जैस्वाल यांनी दिल्या.

जिल्हा परिषदेत बुधवारी (दि. १८) जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली पशुसंवर्धन व दुग्धशाळा विषय समितीची बैठक झाली. या बैठकीत वैरण विकास योजनेचा आढावा घेण्यात आला. योजनेतून उत्पादित होणारा चारा अंदाजे २८ दिवस पुरेल, अशी अपेक्षा असून, मागील शिल्लक चाऱ्यासह उपलब्ध साठ्याचे मार्चअखेरपर्यंत पुरेल अशा पद्धतीने नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना आधार आधारित बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीद्वारे (AEBAS) दररोज ऑनलाइन हजेरी नोंदविणे बंधनकारक आहे. त्यामुळे सर्वांनी ऑनलाइन नोंदणी करून नियमित हजेरी नोंदवावी. जे संस्थाप्रमुख या प्रणालीद्वारे हजेरी नोंदविणार नाहीत, त्यांची नावे कळवावीत, अशा सूचनाही त्यांनी तालुका प्रमुखांना दिल्या. याशिवाय पशुसंवर्धन दिनानिमित्त जिल्ह्यातील गुणवंत पशुवैद्यकांना पुरस्कार देण्यासाठी प्रस्ताव तयार करावा आणि चालू वर्षात पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करावे, असेही त्यांनी सांगितले. बैठकीला समिती सदस्य पांडुरंग औटे, राधाकृष्ण काकडे, लंकाबाई जाधव, स्वाती पाटेकर, सुनीता खंडागळे, रेखा चव्हाण, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धशाळा नानासाहेब कदम, डॉ. ज्ञानेश्वर बिडाईत, जिल्ह्यातील सर्व तालुका पशुसंवर्धन अधिकारी आणि विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

वेरूळ येथील नाथाश्रमात भाऊबीज व स्नेहमिलनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी - श्री क्षेत्र वेरूळ येथील सद्गुरू अक्काताई महाराज यांच्या नाथ आश्रम येथे दीपावलीनिमित्त स्नेहमिलन व भाऊबीजेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी आलेल्या नाथभक्त परिवारातील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने आगामी डिसेंबर महिन्यात छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील टाकळी येथे आयोजित करण्यात येणाऱ्या अखंड फिरत्या नारळी सप्ताहाच्या नियोजनासाठी अक्काताई महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते



. संत-महंतांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत सप्ताहाचे आयोजन, नियोजन आणि विविध जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. राज्यभरातून आलेल्या नाथभक्तांनी या बैठकीत सहभाग घेत आगामी सप्ताह यशस्वी करण्यासाठी आपापली मते व सूचना मांडल्या.

दरम्यान, भाऊबीजेच्या निमित्ताने आश्रमात उपस्थित असलेल्या सर्व भाविकांना तसेच संत-महंतांना शाल, श्रीफळ, करदोडा व बताशे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी सर्वांना दीपावली व भाऊबीजेच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

या स्नेहमिलनाच्या कार्यक्रमातून नाथभक्तांमधील एकोपा, श्रद्धा आणि बंधुभावाचे दर्शन घडले. कार्यक्रमाची सांगता उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून करण्यात आली.

केरळच्या 'कुटुंबश्री' अभियानातून महिला बचत गटांना उद्योगाची नवी दिशा!

खासदार संदिपान भुमरे यांची वायनाडमधील अन्न प्रक्रिया उद्योगांना भेट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

वायनाड (केरळ) : महिला बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देत महिलांना उद्योजक बनविण्याचा केरळमधील 'कुटुंबश्री' अभियानाचा प्रयोग महाराष्ट्रासाठीही दिशादर्शक ठरू शकतो, असे मत खासदार संदिपान भुमरे यांनी व्यक्त केले. संसदेच्या ग्रामीण विकास आणि पंचायती राजविषयक स्थायी समितीचे सदस्य असलेल्या खासदार भुमरे यांनी बुधवार, १८ नोव्हेंबर रोजी केरळमधील वायनाड जिल्ह्यातील महिला स्वयंसहायता बचत गटांच्या अन्न प्रक्रिया उद्योगांना समितीच्या सदस्यांसह भेट दिली.

केरळमध्ये 'कुटुंबश्री' अभियानांतर्गत महिला बचत गट



'नन्मा' (NANMA) या ब्रँडअंतर्गत विविध पारंपरिक खाद्यपदार्थांची निर्मिती आणि विक्री करतात. या उत्पादन केंद्राला भेट देऊन खासदार भुमरे यांनी महिलांशी संवाद साधला. उद्योगाची उभारणी, उत्पादन प्रक्रिया, आर्थिक नियोजन, ब्रँडिंग आणि विक्री व्यवस्थेची माहिती जाणून घेतली.

या बचत गटांकडून केळी व फणसाचे वेफर्स, घरगुती शाकाहारी आणि मांसाहारी लोणची, मसाले, तांदळाचे पीठ तसेच विविध बेकरी उत्पादने तयार केली जातात. पारंपरिक खाद्यसंस्कृतीला व्यावसायिक स्वरूप देत महिलांनी स्वतःचे उद्योग उभे केले आहेत.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल स्थानिक शेतकऱ्यांकडून थेट खरेदी केला जातो. केळी, फणस, नारळ आणि आंबे यांसारख्या शेतीमालाला बाजारपेठ मिळत असल्याने शेतकऱ्यांनाही आर्थिक फायदा होत आहे. त्यामुळे महिला उद्योजकता आणि शेती यांचा समन्वय साधत ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत.

महिला बचत गटांची उत्पादने 'नन्मा स्टोअर', नॅनो मार्केट्स, सरकारी प्रदर्शने आणि विविध मेळाव्यांमधून विकली जातात. बचत गटांना केवळ आर्थिक बचतीपुरते मर्यादित न ठेवता उत्पादनापासून ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि विपणनापर्यंतच्या संपूर्ण व्यावसायिक प्रक्रियेत सहभागी करून घेण्याची ही पद्धत समितीने जाणून घेतली.

महाराष्ट्रातही मोठी संधी

महाराष्ट्रात महिला बचत गटांच्या माध्यमातून पापड, लोणची, मसाले, धान्य प्रक्रिया, फळ प्रक्रिया आणि पारंपरिक खाद्यपदार्थ निर्मितीला मोठी संधी आहे. या उद्योगांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य, गुणवत्ता नियंत्रण आणि कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण महिलांसाठी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील, असे खासदार भुमरे यांनी सांगितले.

केरळमधील या यशस्वी प्रयोगाचा अभ्यास करून अशा प्रकारचे उपक्रम महाराष्ट्रासह देशातील अन्य राज्यांमध्येही राबविता येऊ शकतात. महिला बचत गट, शेतकरी आणि बाजारपेठ यांना एकत्र जोडणारे हे मॉडेल ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरू शकते, असे निरीक्षण संसदीय स्थायी समितीने नोंदविले.

जागतिक शौचालय दिनानिमित्त जिल्ह्यात 19 नोव्हेंबरपासून विशेष स्वच्छता अभियान

10 डिसेंबरपर्यंत राबविणार 'स्वच्छ शौचालय, गरिमामय भविष्य' उपक्रम; नागरिकांच्या सहभागाचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जागतिक शौचालय दिनानिमित्त जिल्ह्यात १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२६ या कालावधीत 'स्वच्छ शौचालय, गरिमामय भविष्य' हे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील सार्वजनिक, सामुदायिक, शाळा आणि अंगणवाड्यांमधील शौचालयांची स्वच्छता, सुरक्षितता व उपयुक्तता वाढविण्यासह प्रत्येक कुटुंबाने वैयक्तिक शौचालयाचा नियमित वापर करावा, यासाठी अभियानाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या पेयजल व स्वच्छता विभागाच्या निर्देशानुसार हे अभियान राबविण्यात येत आहे. संयुक्त राष्ट्र संघाने यंदाच्या जागतिक शौचालय दिनाची 'सुरक्षित शौचालये, समान भविष्य' ही संकल्पना निश्चित केली आहे. प्रत्येक नागरिकाला सुरक्षित, स्वच्छ आणि सुलभ शौचालय सुविधा उपलब्ध करून देणे हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

अभियानांतर्गत ग्रामीण भागातील सार्वजनिक व सामुदायिक स्वच्छता संकुले, शाळा आणि अंगणवाड्यांमधील शौचालयांची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती व सुधारणा करण्यात येणार आहेत. विशेषतः महिला, विद्यार्थिनी आणि दिव्यांग व्यक्तींना शौचालयांचा सुरक्षित व सुलभ वापर करता यावा, यासाठी आवश्यक सुविधांवर भर दिला जाणार आहे. तसेच एक खड्डा असलेल्या शौचालयांचे दोन खड्ड्यांच्या शौचालयांमध्ये रूपांतर, सोकपिट नसलेल्या सेप्टिक टँकमध्ये सोकपिटची सुविधा आणि मैला गाळ व्यवस्थापनाच्या नियमांबाबत ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

गावांचा हागणदारीमुक्त दर्जा कायम राखणे, शौचालयांचा नियमित वापर, साबणाने हात धुण्याची सवय आणि घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ बाबत जनजागृती करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. यामध्ये ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाड्या, महिला बचत गट आणि ग्रामस्थांचा सहभाग घेतला जाणार आहे.

अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सार्वजनिक स्वच्छता संकुलांसह संस्थात्मक व वैयक्तिक घरगुती शौचालयांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. उल्लेखनीय काम करणाऱ्या ग्रामपंचायती आणि लाभार्थ्यांचा गौरव केला जाणार असून, ९ व १० डिसेंबर रोजी जिल्हा व ग्रामपंचायत स्तरावर सांगता कार्यक्रम होईल. अभियानाची प्रगती स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) च्या निर्धारित प्रणालीवर नोंदविण्यात येणार आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल, बांधकाम सभापती सचिन गरड, समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के, आरोग्य व शिक्षण सभापती अनिताताई ज्ञानेश्वर मोठे, महिला व बालकल्याण सभापती मीनाक्षीताई किशोर पवार आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी नागरिकांना अभियानात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे. तसेच पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहास ढोकणे आणि पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेबराव चव्हाण यांनीही स्वच्छतेच्या उपक्रमात ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

तोगरे दांपत्य तर्फे औषधे दान. समाजापुढे उभा केला नवा आदर्श



उरण दि १८(विठ्ठल ममताबादे)परकियांच्या गुलामीत जन्मलेल्या भारतवाशियांना सावध करणारे पहिले स्वातंत्र्याचे उद्गाते, सशस्त्र क्रांतीचे जनक, सत्यशोधक चळवळीचे संरक्षक, देशहित चिंतक, तन-मन'-धनाने राष्ट्रसेवेची प्रेरणा देणारे, जन जागृतीची ज्योत पेटविणारे, आद्य क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांची २३२ वी जयंती निमित प्राथमिक आरोग्य केंद्र रेवदंडा, ता.अलिबाग, जि. रायगड येथे महाराष्ट्र प्रख्यात महाराष्ट्र शासन पुरस्कृत समाज सेवक उरणचे दांपत्य संग्राम तोगरे व सुमनताई संग्राम तोगरे यांनी ३०३ प्रकारची रू. १, ३५, ०००/- (एक लाख पस्तीस हजार) रूपये किंमतीची औषधे दान करून भारताचे आद्य क्रांती गुरू लहुजी वस्ताद साळवे यांना अभिवादन केले. या प्रसंगी रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अशिष जयवंत धरणकर, डॉ. अमित मुरलीधर पठारे, कर्मचारी राजेंद्र रूईकर, राम तुळशिराम म्हात्रे,ऐश्वर्या आगावकर,मनाली दिवकर तसेच उरणचे सुरेश भोईर, श्री.देशमुख, ऋशीकेष देशमुख उपस्थित होते. जेष्ठ समाजसेवक संग्राम तोगरे आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की आज पर्यंत महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यातील १७३ सरकारी रूग्णालयात व काही नोंदणीकृत सामाजिक संस्थाना डॉक्टरने प्रमाणित केल्या प्रमाणे रूपये २, ०५, २३,३००/-(दोन कोटी, पाच लाख तेवीस हजार तीनशे) रूपयांची औषधे दान केली. ५ जिल्ह्यातील काही वाडे-पाड्यावर नवे-जुणे सर्व प्रकारची कपडे तसेंच ३ जिल्ह्यातील काही आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य दान केलेले आहे. तोगरे दांपत्याच्या या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911